# जनसंपर्क अधिकारी

## मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालय

## रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व ता.जि.ठाणे

**फोन नं. ०२२-२९४५१००१**

Mail ID- pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

**प्रेसनोट २७२ - २२** **दिनांक १२/०९/२०२२**

**ॲक्टीव्हा मोटार सायकल चोरणा-या सराईत गुन्हेगारास अटक करुन वाहन चोरीचे ६ गुन्हे तसेच मोबाईल चोरीचा ०१ गुन्हा असे एकुण ०७ गुन्हे उघड, गुन्हे शाखा कक्ष- २ वसई यांची कामगिरी.**

दिनांक २४/०८/२०२२ रोजी फिर्यादी श्री. राकेश कुमार छोटेलाल यादव, रा. तुंगारेश्वर रोड, सातिवली वसई (पू) ता. वसई, जि.पालघर यांनी त्यांची पांढ-या रंगाची ॲक्टीव्हा क्र. एम.एच. ४८ ए.व्हि ४१५२ ह चोरीस गेली असल्याबाबत माणिकपुर पोलीस ठाणे येथे तक्रार दिल्याने गु.रजि.नं. २९३/२०२२ भा.दं.वि.सं. कलम ३७९ प्रमाणे गुन्हा नोंद करण्यात आला होता.

सदरचा गुन्हा उघडकीस आणण्याच्या दृष्टीने वरिष्ठांनी दिलेल्या सुचना व मार्गदर्शनाप्रमाणे गुन्हे शाखा कक्ष २ वसई मधील अधिकारी व अंमलदार यांनी गुप्त बातमीदारांमार्फत माहिती प्राप्त करुन आरोपी नामे अमन रमझान शेख, वय २२ वर्ष, रा. जोगेश्वरी, मुंबई यास ताब्यात घेवून नमुद आरोपीताकडे चौकशी करता त्याचा खालील गुन्हयांमध्ये सहभाग निष्पन्न झाला आहे. आरोपीकडुन खालील वाहन चोरीचे ६ आणि मोबाईल चोरीचा १ असे एकुण ७ गुन्हे उघडकीस आणुन निवेदन पंचनाम्याव्दारे एकुण १, ६०,०००/- रुपये मालमत्ता हस्तगत करण्यात आली आहे.

| अ.क्र. | पोलीस ठाणे | गुन्हा रजि. नं |
|---|---|---|
| १) | माणिकपुर पोलीस ठाणे | गुन्हा रजि. नं. २९३/२०२२ भा.द.वि.सं.कलम ३७९ प्रमाणे |
| २) | माणिकपुर पोलीस ठाणे | गुन्हा रजि. नं. ३०१/२०२२ भा.द.वि.सं.कलम ३७९ प्रमाणे |
| ३) | नालासोपारा पोलीस ठाणे | गुन्हा रजि. नं. १६/२०२२ भा.द.वि.सं. कलम ३७९ प्रमाणे |
| ४) | भाईंदर पोलीस ठाणे | गुन्हा रजि. नं. ३९०/२०२२ भा.द.वि.सं.कलम ३७९ प्रमाणे |
| ५) | अंबोली पोलीस ठाणे | गुन्हा रजि. नं. ९५२/२०२२ भा.द.वि.सं.कलम ३७९ प्रमाणे |
| ६) | कांदिवली पोलीस ठाणे | गुन्हा रजि. नं. १२१७/२०२२ भा.द.वि.सं.कलम ३७९ प्रमाणे |
| ७) | आचोळे पोलीस ठाणे | गुन्हा रजि. नं. ४४१/२०२२ भा.द.वि.सं.कलम ३७९ प्रमाणे |

अटक आरोपीत याचे विरोधात यापुर्वी वाहन चोरीचे जागेश्वरी पोलीस ठाणे-२ गुन्हे, डी. एन. नगर पोलीस ठाणे- १ गुन्हा, कस्तुरबा गांधी पोलीस ठाणे- १ गुन्हा, मालाड पोलीस ठाणे- १ गुन्हा असे ०५ गुन्हे मुंबई येथे तसेच नालासोपारा पोलीस ठाणे -१ गुन्हा, तुळींज पोलीस ठाणे -१ गुन्हा, अर्नाळा सागरी पोलीस ठाणे - १ गुन्हा, नवघर पोलीस ठाणे - १ गुन्हा, वसई पोलीस ठाणे -१ गुन्हा, विरार पोलीस ठाणे - ३ गुन्हे असे एकुण १३ गुन्हे दाखल आहेत.

सदरची कामगिरी  श्री. विजयकांत सागर, पोलीस उप आयुक्त (मुख्यालय), अति. कार्यभार (गुन्हे), श्री. अमोल मांडवे सहा. पोलीस आयुक्त (गुन्हे) यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक शाहुराज रणवरे, वरिष्ठ पोलीस निरिक्षक गुन्हे शाखा-२ वसई, स.पो.नि सुहास कांबळे, सागर शिंदे, सहा.फौज. रमेश भोसले, पो.हवा. मंगेश चव्हाण, संजय नवले, महेश पागधरे, चंदन मोरे, सचिन पाटील, जगदीश गोवारी, पो.ना. प्रशांतकुमार ठाकुर, रमेश आलदर, पो.अं. अमोल कोरे, दादा आडके, सुधीर नरळे यांनी केली आहे.




-----000-----